International Journal of Advance and Applied Research (IJAAR) ISSN – 2347-7075
Peer Reviewed Bi-Monthly Impact Factor – 5.136
Vol.4 No.6 July - Aug 2017

# प्रति पंढरपूर नंदवाळ पर्यटन स्थळांचाअभ्यास

**डॉ. धनाजी आप्पासो चौगले**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

**गोषवारा:**

प्रतिपंढरपूर नंदवाळ हे पर्यटन स्थळ कोल्हापूरजिल्ह्यातील करवीर तालुक्यात आहे. या पर्यटन स्थळांच्या ठिकाणी विठ्ठल मंदिर, भीमाशंकर मंदिर, भीमाशंकर तलाव आहेत. विठ्ठल मंदिर हे एक प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळ नंदवाळ येथे आहे येते वर्षभर लाखो पर्यटक भेट देतात, या पर्यटन स्थळांचा ठिकाणी येण्यासाठी रस्ते,राहण्याची व वाहनांची सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे तसेच या धार्मिक पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी येते गायरान जमिनीवर भक्ती निवास, भोजन व्यवस्था, पार्किंगची व्यवस्था, आरोग्यविषयक व्यवस्था व सुरक्षेविषयक व्यवस्था उपलब्ध करून दिल्यास हे पर्यटन स्थळ अल्पकालावधीत विकसित होईल. तसेच भीमाशंकर मंदिराजवळ भीमाशंकर तलाव आहे, भाविकांना व पर्यटकांना जर या तलावांमध्ये बोटिंगची सुविधा उपलब्ध करून दिल्यास स्थानिक लोकांना तर रोजगार उपलब्ध होईलच परंतु येथील लोकांचे जीवनमान ही सुधारेल म्हणून मी प्रस्तुत शोधनिबंधात प्रति पंढरपूर नांदवळ पर्यटन स्थळांचा अभ्यासहा विषय निवडलेला आहे.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्रामध्ये पर्यटन विकासास वाव आहे, कारण महाराष्ट्रामध्ये भौगोलिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक विविधता आहे. पर्यटन हा आर्थिक व्यवसाय आहे. ज्या ठिकाणी पर्यटन केंद्र आहेत अशा ठिकाणी भरपूर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात म्हणून महाराष्ट्रातील पर्यटन स्थळाचा विकास करणे हे उद्दिष्ट ठेवून महाराष्ट्र सरकारने 2011 हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून साजरे केले महाराष्ट्रामध्ये नैसर्गिक, धार्मिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटन स्थळाचा विकास झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर हा जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने अग्रेसर आहे. या जिल्ह्यांमध्ये अनेक धार्मिक, नैसर्गिक, ऐतिहासिक व संस्कृतिक

पर्यटन स्थळे आहेत. त्यातीलच एक नंदवाळ हे कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील एक धार्मिक ठिकाण आहे. या धार्मिक ठिकाणी विठ्ठल मंदिर आहे यालाच प्रतिपंढरपूर म्हणूनही ओळखले जाते हे पर्यटन स्थळ दुर्लक्षित राहिले आहे भविष्यात या पर्यटनस्थळाचा अभ्यास करून विकास केल्यास अनेक फायदे होतील म्हणूनच या ठिकाणी प्रस्तुत शोध निबंधात प्रतिपंढरपूर एक पर्यटन स्थळ हा विषय निवडला आहे.

**उद्दिष्टे:**

१. नंदवाळ पर्यटन स्थळांचा अभ्यास करणे

२. नंदवाळ पर्यटन स्थळ दुर्लक्षित का राहिले त्यामागील कारणांचा अभ्यास करणे

३. नंदवाळ पर्यटन स्थळ म्हणून विकसित होण्यासाठी उपाययोजना सुचवणे

**अभ्यास क्षेत्र:**

नंदवाळ हे करवीर तालुक्यातील एक प्रसिद्ध धार्मिक ठिकाण आहे हे ठिकाण कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिणेला कोल्हापूर पासून दहा किलोमीटर अंतरावर आहे नंदवाळ या गावचे क्षेत्रफळ १७१८.५ चौरस किलोमीटर एवढे आहे. नंदवाळ गावचा अक्षवृत्तीय विस्तार 16°37'35"उत्तर अक्षवृत्त व आणि रेखावृत्तीय विस्तार 74°11'00" पूर्व रेखावृत्त आहे.2011 च्या जनगणनेनुसार नंदवाळ गावची लोकसंख्या १७४४ एवढी आहे.नंदवाळच्या उत्तरेस वाशी, दक्षिणेस जैताळ, पश्चिमेस कांडगाव, पूर्वेस बालिंगा ही गावे आहेत

**माहिती संकलन व अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधसाठी आवश्यक असणारी प्राथमिक आकडेवारी प्रत्यक्ष पर्यटन स्थळाच्या ठिकाणी जाऊन प्रश्नावली व मुलाखतीच्या साह्याने मिळवली तर दुय्यम आकडेवारी वर्तमानपत्रे शासकीय प्रकाशने, इंटरनेट, जिल्हा जनगणना अहवाल ,नियतकालिके, ग्रंथ, पुस्तके या मधून संकलित केली. उपलब्ध माहितीवर प्रक्रिया करून त्याचे विश्लेषण करण्यात आलेले आहे

**माहितीचे विश्लेषण:**

नंदवाळ हे कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील एक प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळ आहेहे पर्यटन स्थळ कोल्हापूर च्या दक्षिणेला दहा किलोमीटर अंतरावर आहे हे धार्मिक पर्यटन स्थळ दुर्लक्षित आहे त्याचा विकास करण्यासाठी अनेक उपाययोजना कराव्या लागतील त्याचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे:-

**प्रतिपंढरपूर नंदवाळ पर्यटन स्थळांची वैशिष्ट्ये**

**विठ्ठल मंदिर:**

कोल्हापूर जिल्ह्यातील, करवीर तालुक्यातील नांदवळ येथे प्राचीन हेमांडपंती विठ्ठल मंदिर आहेहे विठ्ठल मंदिर कोल्हापूर जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळ आहे हे पर्यटन स्थळ करवीर पासून दहा किलोमीटर अंतरावर आहेनंदवाळ येथे पंढरपूरचा विठोबा हा दररोज मुक्कामासाठी येत असतो तो पांडुरंग बत्तीशीयुगी असून पंढरपूरचा अठावीसयुगी आहे असा उल्लेख आढळतो. नंदवाळ ला प्रतिपंढरपूर म्हणून हे ओळखले जाते या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी प्रत्येक एकादशीला हजारो भाविक येतात. या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी आषाढी व कार्तिकीला लाखो भाविक भेटी देतात. पंढरपूर प्रमाणे येथेही दिंड्या व पालखी रिंगण सोहळा होतो.

**भाविकांची वाढती संख्या:**

आम्ही केलेल्या सर्वेक्षणात असे दिसून आले की गेल्या दहा वर्षात नंदवाळ या पर्यटनाच्या ठिकाणी भाविकांची संख्या आषाढी व कार्तिकी एकादशीस वाढत आहे आषाढी एकादशीला जवळजवळ तीन लाख भाविक या पर्यटन स्थळी भेट देतात त्याचबरोबर मागवारी, चैत्र वारी, कार्तिक वारी ला ही भाविकांची संख्या वाढत आहे

**दिंड्या व रिंगण सोहळा:**

आषाढी एकादशीनिमित्त या पर्यटनस्थळी जवळजवळ साठच्या आसपास स्थानिक भागातील दिंड्या येतात यामध्ये शेळकेवाडी, कांडगाव, देवाळे, महे, बाचणी, हळदी, कुर्डू, कोथळी, सडोली, हसुर, कणेरीवाडी, गिरगाव , शिंगणापूर, अरे, गाडेगोड वाडी, चापोडी, राशिवडे, मोहडे, बर्गेवाडी,

अर्जुनवाड,तांदुळवाडी, बेले, कुशिरे, कारभार वाडी, कसबा बावडाइत्यादी गावातील दिंड्या येतात.कोल्हापूर साठी हा एक उत्सव समजला जातो. कोल्हापुरातून ज्ञानेश्वर माऊली भक्त मंडळातर्फे मंगळवार पेठेतील विठ्ठल मंदिराच्या परिसरात विविध गावातील दिंड्या चे आगमन होते त्या सर्व दिंड्या सकाळी आठच्या सुमारास तिथून निघतात व संकल्प सिद्धी मंगल कार्यालया समोर सकाळी दहा ते अकरा वेळेस येतात. संकल्पसिद्धी मंगल कार्यालया समोर एक मोठा रिंगण सोहळा अतिशय विलोभनीय पद्धतीने पार पाडला जातो.येथे भाविक भक्तांची गर्दी आलोट असते तसेच या दिंड्यांमध्ये अनेक गावातील भजनी मंडळी ही सहभागी असतात. रिंगण सोहळा समाप्त झाल्यानंतर सर्व दिंड्या नंदवाळ कडे प्रयाण होतात (प्रा.एन.के.बनसोडे)

**भीमाशंकर मंदिर**

नंदवाळ याठिकाणी विठ्ठल मंदिर तर आहेच त्याच बरोबर नंदवाळच्या पूर्व बाजूस भीमाशंकर तीर्थक्षेत्र आहे. त्या ठिकाणी पुरातन महादेवाचे लिंग आहे त्या लिंगाला कान लावला असता आतून पाणी वाहण्याचा आवाज येतो. त्यामुळे तेथे गुप्त नदी वाहते असे सांगितले जाते भीमाशंकर हे तीर्थ क्षेत्र महाराष्ट्रात दोन ठिकाणी आहे त्यातील एक नंदवाळ हे होय. याठिकाणी प्रत्येक श्रावण सोमवारी यात्रा भरते शेजारीच एक भीमाशंकर तलाव आहे. भविष्यात भीमाशंकर तलावात बोटिंगची सुविधा उपलब्ध केल्यास पर्यटनाचा तर विकास होईलच पण स्थानिक लोकांना रोजगारही उपलब्ध होईल.

**प्रति पंढरपूर नंदवाळ पर्यटन स्थळ दुर्लक्षित राहण्याची कारणे**

नंदवाळ हे पर्यटन स्थळ कोल्हापूर पासून जवळ असले तरीसुद्धा या पर्यटन स्थळाच्याठिकाणी कोल्हापूर पासून जाण्यासाठी वाहतुकीची साधने नाहीत. त्याचबरोबर हे पर्यटन स्थळ शहरानजीक असूनसुद्धाबसची सुविधा या ठिकाणी नाही. त्यामुळे भाविकांना त्याठिकाणी सहजासहजी पोहोचता येत नाही. त्याचबरोबर आषाढी व कार्तिकी एकादशीला हजारो भाविक या पर्यटन स्थळी भेटी देतात. त्यांच्या वाहनासाठी कोणतीही पार्किंग व्यवस्था मंदिर परिसरात नाही. नंदवाळ हे प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी निवास या व्यवस्थेचा अभाव आढळतो तसेच पर्यटकांची किंवा भाविकांची संख्या मोठ्याप्रमाणात येत असल्यामुळे येथे शौचालय आढळतनाहीत. ही नंदवाळ येथील

विठ्ठल मंदिराच्या आजूबाजूस अनेक घरे जवळजवळ आहेत त्यामुळे त्या परिसरात गर्दी झालेली दिसून येते. या पर्यटन ठिकाणी मूलभूत सुविधा असाव्या लागतात त्या याठिकाणी नाही. विठ्ठल मंदिरा पासून भीमाशंकर मंदिरापर्यंत रस्त्याची समस्या जाणवते थोडक्यात या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी रस्ते, वाहतुकीची साधने, पार्किंगची सुविधा, आरोग्यविषयक सुविधा, शौचालयाची सुविधा, भक्ती निवास,जागेची समस्या दिसून येतात.त्यामुळे हेपर्यटन स्थळ दुर्लक्षितआहे.

**प्रतिपंढरपूर नंदवाळ पर्यटन विकासासाठी उपाय योजना**

नंदवाळ या धार्मिक पर्यटनाचा विकास करण्यासाठी कोल्हापूर हुन विशेष बस सुविधा सुरू केल्यास या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी भाविकांची संख्या वाढून रोजगार निर्मिती होऊन या पर्यटनस्थळाचा विकास होईल.आषाढी व कार्तिकी वारी दिवशी या गावातील गायरान क्षेत्रावर वाहनांची कायमस्वरूपी पार्किंग सुविधा उपलब्ध करून त्या ठिकाणी पार्किंग कर ठेवल्यास गावाचे आर्थिक उत्पन्न वाढून या पर्यटनस्थळाचा विकास होण्यास व पार्किंगची समस्या सुटण्यास मदत होईल.या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी जवळजवळ ८६ हेक्टर गायरान जमीन आहे. या जमिनीवर खाजगी किंवा राज्य सरकारच्या मदतीने भक्ती निवास व भोजन व्यवस्था उपलब्ध करून दिल्यास भाविकांची संख्या वाढून रोजगार निर्मिती होऊन या पर्यटन ठिकाणाचा विकास होईल.नंदवाळ पर्यटन ठिकाणी विठ्ठल मंदिराच्या शेजारी जी घरे आहेत त्या घरांसाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देवून मंदिराच्या परिसरात ज्या जागेची कमतरता आहे ती समस्या सोडवण्यास मदत होईल.नंदवाळ पर्यटन ठिकाणी आरोग्य विषयक सुविधा, केर कचरा निर्मूलन विषय सुविधा व शौचालय उपलब्ध करून दिल्यास स्वच्छतेचा प्रश्न सुटेल.दरवर्षी या धार्मिक पर्यटन स्थळाच्या ठिकाणी हजारो भाविक भेटी देतात त्यामुळे राज्य सरकारने या पर्यटन ठिकाणी अ वर्ग दर्जा दिल्यास येथील तीर्थक्षेत्र विकास थोड्या कालावधीत होईल. ग्रामपंचायतीने राज्य शासनास जो तिर्थक्षेत्र आराखडा तयार करून दिलेला आहे तो मंजूर केल्यास या गावातील लोकांना रोजगार उपलब्ध होऊन लवकरच हे पर्यटन स्थळ भारतामध्ये प्रसिद्ध होईल.नंदवाळ पासून भीमाशंकर पर्यंत पक्का रस्ता केल्यास व भीमाशंकर तलावामध्ये बोटिंगची व्यवस्था केल्यास पर्यटकांना बोटिंगचा आनंद घेता येईल व यातून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल पर्यायाने या पर्यटनस्थळाचा ही विकास होईल.नंदवाळ पर्यटन स्थळाची माहिती

जिल्हा पर्यटन विभागाने प्रसिद्ध केल्यास या ठिकाणी हजारो देशी पर्यटक आकर्षित होतील व पर्यटन विकासास चालना मिळेल.

**निष्कर्ष:**

प्रतिपंढरपूर नंदवाळ हे करवीर तालुक्यातील प्रसिद्ध धार्मिक पर्यटन स्थळ आहे.या धार्मिक पर्यटन स्थळा जवळच भीमाशंकर तलाव आहे, या तलावाजवळ भीमाशंकर मंदिर आहे या पर्यटन केंद्राचा विकास करण्यासाठी विठ्ठल मंदिर, भीमाशंकर मंदिर, भीमाशंकर तलाव परिसराचा विकास करणे गरजेचे आहे. या पर्यटन केंद्राच्या ठिकाणी पक्के रस्ते निर्माण करण्यासाठी पाठपुरावा करणे व विशेष बस सुविधा चालू करण्यास लोकप्रतिनिधीला सांगणे गरजेचे आहे.भविष्यात या पर्यटन स्थळाच्या ठिकाणी गायरान जमिनीवर एक भक्ती निवास, पार्किंगची व्यवस्था, भोजन व्यवस्था, आरोग्य विषयक सुविधा, उपलब्ध करून दिल्यास हे पर्यटन स्थळ अल्पावधीतच प्रसिद्ध होईल. या पर्यटन ठिकाणी आषाढी व कार्तिकी वारी ला लाखो भाविक भेट देतात त्यामुळे राज्य सरकारने ग्रामपंचायतीने दिलेला तिर्थक्षेत्र आराखडा मंजूर करून येथील पर्यटनाचा विकास केल्यास या गावातील स्थानिक लोकांना रोजगार निर्मिती होऊन या गावाचा विकास भविष्यात झालेला दिसून येईल.

**संदर्भ:**

१. पर्यटन भूगोल: प्रा.डॉ. एस. बी. शिंदे
२. पर्यटन भूगोल: प्रा.के. ए.खतीब
३. प्रा. एन. के. बनसोडे (२०११): नंदवाळ एक दुर्लक्षित धार्मिक पर्यटन स्थळ एक चिकित्सक अभ्यास
४. श्री करवीर महात्मा ग्रंथ: अध्याय ४७,
५. जिल्हा जनगणना अहवाल २०११
६. कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर